विभागीय आयुक्त, अमरावती तथा मतदार नोंदणी अधिकारी, अमरावती विभाग पदवीधर मतदार संघ
अमरावती (महाराष्ट्र) यांचे कार्यालय

## परिशिष्ट अ-१

## भारत निवडणूक आयोग

## महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग पदवीधर विभाग मतदार संघाची मतदार यादी तयार करणे

## मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (४) अन्वये नोटीस

मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (४) नुसार अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाचे मतदार नोंदणीअधिकारी, हे त्यांच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२२ च्या नोटीसनुसार अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाचे मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीस असे आवाहन करतात की, मतदार नोंदणी नियम १९६० याला जोडलेला आणि दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२२ ला **(१) नवभारत (२) दिव्य मराठी** या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या नोटीस मधील अनुसूची दोन मध्ये दिलेल्या नमुना १८ मध्ये **दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२** रोजी वा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत, मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व पदनिर्देशित अधिकारी यांचे कार्यालयात या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी त्याने/तिने पाठवावा किंवा पोहचवावा.

वर उल्लेखित व्यक्तींनी जर यापुर्वी त्यांची नावे मतदार यादीत नोंदविलेली नसतील तर त्यांनी नमुना १८ मधील त्यांचे अर्ज **दिनांक ०७ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यापुर्वी** कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

या संदर्भात सर्व माहिती मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांचे संकेतस्थळ www.amravatidivision.gov.in वर सुध्दा उपलब्ध आहे.

ठिकाण : अमरावती
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२२

(डॉ. दिलीप पांढरपट्टे)
विभागीय आयुक्त, अमरावती
तथा मतदार नोंदणी अधिकारी अमरावती विभाग
पदवीधर मतदार संघ, अमरावती

Scanned with CamScanner